# प्रकरण - ४

## महाविद्यालयाची 'कमवा व शिका' योजना

# प्रकरण चौथे

## महाविद्यालयाची 'कमवा आणि शिका' योजना

डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील हे सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते होते. या चळवळीच्या विचारातूनच भाऊराव बहुजन समाजाच्या शैक्षणिक उद्धाराकडे वळले. सत्यशोधक चळवळीतून बहुजन समाजाची सर्वांगीण प्रगती करण्याचा प्रयत्न केला जात असे. ही प्रगती करावयाची असेल तर बहुजन समाजातील अज्ञान, अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा नष्ट करणे आवश्यक होते आणि त्यासाठी शिक्षणाची आवश्यकता होती. ही बाब ओळखून भाऊरावांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली व आपले शिक्षणकार्य साधण्याचा नेटाने प्रयत्न केला. त्यांच्या प्रेरणेने सर्व जातीधर्माचे आजन्म कार्यकर्ते सेवक संस्थेत तयार झाले. रयत शिक्षण संस्था खऱ्या अर्थाने जनतेची झाली. 'स्वावलंबी शिक्षण' हे संस्थेचे ब्रीदवाक्य ठरले.[१] रयत शिक्षण संस्थेच्या इतिहासात 'कमवा व शिका' या योजनेला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. 'कमवा व शिका' योजनेचा भाऊरावांच्या मनावरील प्रभाव पुढीलप्रमाणे नमूद करावा लागतो.

### 'कमवा व शिका' योजनेचा व स्वालंबनाचा भाऊरावांच्या मनावरील प्रभाव -

'मोहीते' नावाच्या एका हरिजन विद्यार्थ्याला घेऊन भाऊरावांनी सातारा येथे वसतीगृहाची सुरूवात केली. सुरूवातीला भाऊरावांनी वसतीगृहास घरामध्येच सुरूवात केली. दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली. जागेची अडचण जाणवू लागली. अस्पृश्यांची मुले वसतीगृहात असल्यामुळे वसतीगृहाकरिता जागा मिळेनाशी झाली. वसतीगृहातले सर्व विद्यार्थी ग्रामीण भागातले व गरीब घरातले होते. विद्यार्थी संख्या वाढत असल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांच्या जेवणाची व्यवस्था करणे भाऊरावांना अवघड वाटू लागले. विद्यार्थ्यांच्या घरची परिस्थिती गरीब असल्याने त्यांच्या घरून पैसा येणे

शक्य नव्हते. अशा परिस्थितीत 'गरज ही शोधाची जननी' या उक्तीप्रमाणे भाऊरावांना धनिणीची बाग खंडाने मिळाली आणि या बागेमध्ये भाऊरावांनी 'स्वावलंबनाचा' नवा प्रयोग सुरू केला. या बागेतून फळे व भाजीपाल्याचे उत्पादन घेण्यास सुरूवात केली. या प्रयोगामध्ये भाऊराव यशस्वी झाले.[२] रयत शिक्षण संस्थेच्या सर्व महाविद्यालयांमध्ये 'कमवा व शिका' ही योजना सुरू केली.

मध्यस्थ - दलाल नको अशी एक महत्त्वाची विचारधारा महात्मा फुले यांची होती. स्वावलंबनात मध्यस्थ - त्रयस्थ नसतो. स्वावलंबनात 'स्व' हा स्वतः स्वावलंबी असतो. परावलंबी नसतो. स्वतःची सोडवणूक तो स्वतः करतो. 'स्वावलंबन' हे रयत शिक्षण संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. हे ब्रीद केवळ ध्येयवाक्यच नव्हे, तर ते एक तत्वज्ञान आहे. अद्वैत स्थितीत मध्यस्थ नसतो. आत्मा हा स्वोद्धारार्थ परमात्म्याशी सख्य करतो. परमार्थात व अध्यात्मात जे स्वावलंबन अत्यंत श्रेष्ठ व परमोच्च मानले जाते, तेच स्वावलंबनाचे परम तत्व ऐहिक व सांसारिक उन्नतीसाठी भाऊरावांनी स्विकारले व ते सार्वजनिक केले. या संस्थेच्या मागे तत्वे आहेत. व्यक्ती या नात्याने भाऊरावांनी जो जीवनमार्ग अवलंबिला होता, ती जीवीतसरणी संस्थेच्या मागे त्यांनी सार्वजनिक हितार्थ उभी केली. स्वावलंबन नसेल तर आत्मपरीक्षण व आत्मोद्धार अशक्य होय. विधायक कार्याचा विस्तारही अशक्य होय. प्रपंचातील जरूर ती काटकसर स्वावलंबनाशिवाय अशक्य होते. ह्याप्रमाणे हे ब्रीदवाक्य जीवनाच्या अंगोपांगांना लागू पडते. भाऊरावांनी स्वीकारलेल्या तत्वज्ञानाचा हा पाया आहे.[३]

स्वावलंबन हे तत्व बुद्धांचेही होते. बुद्ध हे असे धर्मसंस्थापक होवून गेले की त्यांनी स्वतःला अवतार-विभूती, देवाचा लाडका, एकुलता एक पुत्र वगैरे काहीही संबोधून घेतले नाही. स्वयंप्रकाशित व्हा, स्वावलंबी व्हा हा त्यांचा संदेश होता. स्वावलंबन म्हणजे स्वतंत्र स्वराज्य, पारतंत्र्याचा अभाव, कोणत्याही ध्येयासाठी साधन

जे करावयाचे ते स्वावलंबनाने करावे, शिक्षणासाठी विद्यार्थ्यांनी आई-वडीलांवर किती बोजा घालावा. हा बोजा पालकांवर पडू नये म्हणून 'कमवा व शिका' हा मंत्र भाऊरावांनी दिला. वाढत्या महागाईमध्ये हा मंत्र फार गरजेचा आहे. भाऊरावांनी विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविले. विद्यार्थी स्वतःची कामे स्वतः करीत 'कमवा व शिका' योजनेतून शिक्षणाचा खर्च भागवित स्वावलंबनाचे संस्कार शाहू बोर्डींगमध्ये त्यांना प्राप्त झाले. असे विद्यार्थी पुढील जीवनातही स्वावलंबी झाले.[४]

भाऊरावांची रयत शिक्षण संस्था स्थापण्यामागे फक्त शिक्षणसंपन्न असा जनसमाज तयार व्हावा एवढीच महत्वाकांक्षा नव्हती. भाऊरावांना सर्वसामान्य जनतेची सत्ता हवी होती. सर्वसामान्यांचा कारभार हवा होता. जनतेचे राज्य हवे हाते. शेतकऱ्याचे स्वराज्य त्यांना हवे होते. शेतकरी तर गरीब, कर्जबाजारी, अंधश्रद्धाळू, पिळला जाणारा असा वर्ग होता. त्याच्याकडे विद्याबळ नव्हते. बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगून भाऊरावांनी त्यांना शिक्षण परवडेल एवढे स्वस्त व मुबलक केले.[५]

इंग्रजी शिक्षण अतिशय महागडे व प्रभावी असल्याने त्याला 'वाघिणीचे दूध' म्हटले जात असे. आण्णांनी ते वाघिणीचे दूध शेळीच्या दूधासारखे स्वस्त व मुबलक केले. गोरगरीब शेतकऱ्यांच्या व मजूरांच्या झोपड्यांपर्यत शिक्षण पोहचविले. कोणत्याही होतकरू विद्यार्थ्याच्या शिक्षणाच्या आड त्याच्या गरीबीचा अडसर येऊ नये अशी आण्णांची धारणा होती.

आण्णांनी इंग्रजी शिक्षणाला चिकटलेले दोष काढून नवीन शिक्षणपद्धतीला सुरूवात केली. इंग्रजी शिक्षणासाठी शहरात राहिलेला विद्यार्थी पोषाखी बनून आपल्या घरादारापासून व ग्रामीण जीवनापासून अलग पडला होता. आपल्या पडक्या घराची, आई वडिलांच्या व भावंडाच्या कपड्यांची व स्वतःच्या दारिद्र्याची त्याला लाज

वाटावी अशी मनोवृत्ती सुशिक्षीतांमध्ये निर्माण झाली होती. त्यांच्याकडून सामाजिक सेवेची अपेक्षा करणे म्हणजे मृगजळाच्या पाठीमागे लागल्यासारखे होते. आण्णांनी श्रमाच्या मोबदल्यात शिक्षण देण्याची योजना कार्यान्वित केली. गोरगरीब विद्यार्थ्यांना जेवण्याच्या वारासाठी अगर पैशासाठी धनिक लोकांपुढे तोंड वेंगाडण्याची वेळ येऊ नये म्हणून विद्यार्थ्यांनी स्वतःच्या बळावर आपला शिक्षणाचा प्रश्न सोडविण्याचा आत्मविश्वास निर्माण केला.[६]

कर्मवीर आण्णा बहुजनांमध्ये स्वावलंबी शिक्षणाचा प्रसार करण्याकरिता महाराष्ट्रभर हिंडले. विद्यार्थी मिळविण्यातही ते ग्रामीण भागात जात. राष्ट्रोद्धारासाठी ग्रामीण जनतेला शिक्षणाची गरज होती. ग्रामीण जनतेच्या शिक्षणासाठी निराळी दृष्टी व कार्यक्रम हवा हे त्यानी अचूक ओळखले म्हणूनच आण्णांनी आपल्या शिक्षणात स्वावलंबनाच्या तत्वाची कास धरली व त्यावरच मुख्य भर दिला. या शिक्षण प्रसारामुळे मातापित्यापासून व ग्रामीण जनतेपासून ही मुल्ये दुरावणार नाहीत याचीही खबरदारी कर्मवीरांनी घेतली. गरीब आईवडीलांना आपल्या मुलांनी खूप शिकावे अशी इच्छा असते. परंतु गरीबीमुळे या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळत नाही आणि हुशार विद्यार्थी भरकटतात म्हणून आण्णांनी 'कमवा व शिका' ही योजना संस्थेमध्ये सुरू केली आणि अशा गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली व यातूनच सामाजिक व राष्ट्रीय नुकसान आण्णांनी थांबविले.[७]

सुरूवातीला शिक्षण कार्यामध्ये भाऊरावांनी सामाजिक समतेवर भर दिला. सर्व जातीधर्माची मुले भाऊरावांच्या वसतीगृहामध्ये शिक्षण घेत असत. या प्रयोगाला भाऊरावांनी जोड दिली. महाराष्ट्रातील प्रचलित शिक्षण पद्धतीमध्ये भाऊरावांनी क्रांती घडवून आणली. महाविद्यालयीन शिक्षण केवळ पोषाखी आणि पुस्तकी झालेले होते. त्यामुळे सुशिक्षित तरूणांमध्ये बळाचा, तेजाचा, आत्मविश्वासाचा अभाव तीव्रतेने

जाणवतो. स्वत:चे शिक्षण पूर्ण करण्यासाठी उन्हातान्हांत, शेतामध्ये कष्ट करणे आवश्यक आहे ही कल्पना भाऊरावांनी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये बिंबवली. त्याप्रमाणे विद्यार्थीही शिक्षण घेण्यासाठी कष्ट करू लागले. भाऊरावांच्या शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तीमत्व लगेच दिसून येते.[८]

भाऊरावांनी साताऱ्यास छत्रपती शिवाजी कॉलेज काढले. त्यात एक अट होती. फक्त वसतीगृहात राहणाऱ्या आणि आपल्या शिक्षणासाठी श्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना तेथे प्रवेश होता. नंतर सातारामधील पांढरपेशातली मुलेही कॉलेजमध्ये येवू लागली. ही मुले भाऊरावांच्या 'कमवा व शिका' योजनेमध्ये सामील झाली. खेड्डयातील कणखर मराठमोळ्या कोळ्यांच्या मुलांबरोबर ब्राह्मण मुलेही दगड फोडू लागली. शेतीमध्ये काम करू लागली.[९]

खेड्यापाड्यातील मुलांनी आपले गाव सोडून शहरात यावे, शहरी जीवन जगावे आणि शिक्षण घ्यावे, हे भाऊरावांना पसंत नव्हते. शहरात पोसलेल्या मुलांना आपले गाव आवडत नाही, शेती आवडत नाही, आपल्या कुटुंबातील माणसांना ती दुरावतात म्हणून खेड्यातील मुलांचे शिक्षण तेथील वातावरणात झाले पाहिजे. शेतकरी शेतात घाम गाळतो, त्याप्रमाणे त्यांच्या मुलांनी शिक्षण संपादन करण्यासाठी घाम गाळला पाहिजे असे भाऊरावांचे विचार होते. म्हणूनच भाऊरावांनी 'स्वावलंबन', 'कमवा व शिका', 'श्रम हीच पूजा' हे मूलमंत्र विद्यार्थ्यांना दिले.

भाऊरावांच्या वसतीगृहातील सर्व जातीधर्माचे विद्यार्थी एकत्र स्वयंपाक करीत, भाडी घासत, कपडे धुत, दगड फोडत, शेतामध्ये राबत, जनावरे सांभाळीत आणि त्यासोबत अभ्यासही करीत असत.[१०]

कर्मवीरांच्या मनावर जुन्या आश्रमांचा, नालंदा, तक्षशिला या विद्यापीठाचा आणि रविंद्रनाथ टागेरांच्या शांतीनिकेतनचा फार मोठा परिणाम झाला होता. अमेरिकेतील

शिक्षणमहर्षी बुकर टी. वॉशिंग्टन यांच्या विचारप्रणालीचाही कर्मवीरांच्या मनावर खोल ठसा उमटलेला होता. कर्मवीर भाऊरावांना भारताचे बुकर टी. वॉशिंग्टन म्हणून संबोधण्यात येते. कर्मवीर भाऊरावांना अमेरिकन डॉलरपेक्षा मुलांनी फोडलेल्या खडीचे ढिगारे जास्त मौल्यवान वाटत.[११]

भाऊरावांचे स्वतःचे राहणीमान अतिशय साधे होते. त्याचप्रमाणे वसतीगृहातील मुलांनीही कोणत्याही भौतिक सोयींशिवाय साधे रहावे असे भाऊरावांना वाटत असे. घरी अठराविश्वे दारिद्र्य असलेल्या मुलांचे वसतीगृहातील राहणीमान उच्च प्रतीचे असेल तर अशा मुलांना आपल्या आई-वडिलांबद्दल, भावा-बहिणींबद्दल प्रेम वाटणार नाही, परकेपणाची भावना निर्माण होईल, पोषाखीपणा वाढेल म्हणून मुलांवर साधेपणाचे संस्कार करायला हवेत. शिक्षण संपल्यावर मुलांनी आपले घर सुधारले पाहिजे. भावंडांना शिक्षण दिले पाहिजे, स्वतःचाच विचार न करता त्यांनी घरातील खर्चाचा विचार केला पाहिजे. अशा संस्काराचे शिक्षण विद्यार्थ्यांना आदर्श व सुजाण नागरिक म्हणून घडवेल. स्वावलंबन, स्वाभीमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य ही शिक्षण तत्वज्ञानाची चतुःसूत्री स्वीकारली. पोषाखी व पुस्तकी शिक्षणापेक्षा जाणीवजागृतीचे, आदर्श संस्काराचे स्वावलंबी शिक्षण दिले तर भारताचा अभ्युदय लवकर होईल असे भाऊराव म्हणत.[१२]

**'कमवा आणि शिका' योजनेचा विकास व शासनाकडून प्रोत्साहन -**

आण्णांनी साताऱ्यामध्ये १९४७ साली संस्थेमार्फत छत्रपती शिवाजी कॉलेज सुरू केले. संस्थेचे हे पहिले कॉलेज 'फ्री ॲण्ड रेसिडेंशिअल' होते. येथील विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या वसतीगृहात रहावे लागे व प्रत्येकाला रोज दोन तास शारिरीक कष्ट करावे लागे. यासाठी आण्णांनी 'कमवा व शिका' ही योजना सुरू केली.[१३]

आण्णांचा हा प्रयोग यशस्वी होईल की नाही याबद्दल काहींना शंका होती. कारण ज्या मुलांनी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला त्यांना पूर्वी तशाप्रकारच्या कष्टाची सवय नव्हती. श्रम करणाऱ्यांनाच प्रवेश असल्याने श्रीमंतांची मुले येथे येण्याबाबत विचार करू लागली. कारण विद्यार्थ्यांनी रोज दोन तास कष्ट करावे अशी आण्णांची इच्छा होती. त्या उद्दिष्टानुसार १९४७ ते ५१ पर्यंत हे कॉलेज चालविले गेले. शासनाकडून अनुदान मिळत नव्हते. त्यामुळे आण्णांपुढे मोठा आर्थिक प्रश्न होता. त्यामुळे स्थानिक मुलांना कॉलेजमध्ये प्रवेश दिला गेला व फी घेण्यास सुरूवात केली. तेव्हा पूर्वीप्रमाणे त्यांनी शारीरिक कष्ट केले पाहिजेत हा आग्रह आण्णांनी सोडून दिला. असे असूनदेखील १९५८ ते १९५९ या चार वर्षात कॉलेजमधील वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी नियमितपणे श्रमाची अनेक कामे केली.[१४]

स्थानिक मुलांच्या प्रवेशाला आण्णांनी होकार दिला. तरी मोफत शिक्षण पद्धती बंद करून फी आकारणे हे त्यांना मनापासून पटले नव्हते. कारण कष्टाच्या मोबदल्यात गरीब मुलांना शिक्षण द्यावयाचे या त्याच्या मुलभूत विचाराला धक्का पोहचेल असे त्यांना वाटले. त्यामुळे राज्यातील इतर कॉलेजप्रमाणे आपले कॉलेज करण्यापेक्षा ते बंद करावे की काय असा विचार आण्णांच्या मनात आला. कारण त्यामुळे कॉलेजचे पूर्ण स्वरूप बदलणार होते. शेवटी जमा-खर्चातील तूट व इतर आर्थिक अडचणी यातून मार्ग काढण्यासाठी व उच्च शिक्षण देणारे महाविद्यालय चालू रहावे यासाठी आण्णांनी जून १९५१ पासून फी आकारणे सुरू केली.[१५]

या आर्थिक अडचणीतून मार्ग काढण्यासाठी कॉलेजचे प्राचार्य श्री मॅथ्यू यांनी आण्णांच्यां तत्वज्ञानानुसार अभिनव स्वरूपात लेबरस्कीम सुरू केली. १९५२-५३ पासून जे विद्यार्थी या योजनेत सहभागी होवू इच्छितात त्यांच्यासाठी ती सुरू ठेवली. श्रमयोजनेला अधिक शास्त्रशुद्ध स्वरूप देण्यात आले. आण्णांनी जेव्हा वसतीगृहयुक्त

कॉलेज सुरू केले तेव्हा मूळ योजनेत सर्व विद्यार्थ्यांना रोज किमान दोन तास व रविवारी चार ते सहा तास श्रम करणे सक्तीचे होते. या योजनेसाठी जो काही खर्च येणार होता त्याची आर्थिक तरतूद संस्था करणार नव्हती तर ती संपूर्ण जबाबदारी कॉलेज प्रशासनावर टाकण्यात आली. कॉलेज फीची रक्कम भागविण्यासाठी विद्यार्थ्यांना खूप मोठ्या प्रमाणात कष्ट करणे आवश्यक होते. शिवाय हे काम करताना त्या विद्यार्थ्याची शारीरिक क्षमता किती आहे, त्याला श्रम करून अभ्यासाला किती वेळ राहतो, तसेच मुलांना अशा प्रकारची कष्टाची कामे देण्यासाठी कॉलेजकडे असणारी मर्यादित व्यवस्था, यामधून सुवर्णमध्य साधण्यासाठी $^{१}/_{३}$ रक्कम मिळवावी व त्यासाठी त्याला बाजारभावाने मोबदला दिला जावा. तसेच कॉलेजने $^{१}/_{३}$ रक्कमेइतकी फीची सवलत द्यावी आणि लक्ष्मीबाई स्मारक फंडातून त्या विद्यार्थ्यास $^{१}/_{३}$ रक्कमेची कर्जावू शिष्यवृत्ती मिळावी असे ठरविण्यात आले. आण्णांना ही योजना अतिशय आवडली. पुढे १९५४ मध्ये खाजगी संस्थांपुढील आर्थिक प्रश्न या विषयावर जे विचार मांडले त्यात आपल्या 'कमवा व शिका' या योजनेबाबत कथन केले. त्यातील वस्तुस्थिती समजून आल्याने आण्णांच्या सहकाऱ्यांनी योजनेचे स्वरूप बदलण्यास आनंदाने मान्यता दिली.[१६]

१९५० च्या सुमारास मुंबई प्रांताच्या शिक्षण खात्यात प्रा. हुमायून कबीर व डॉ. के. जी. सयद्दीन हे दोन अधिकारी होते. त्यांना आण्णांच्या शैक्षणिक कार्याची माहिती झाल्याने त्यांनी संस्थेस सातारला भेट दिली. त्यांनी पाहिले की गरीब मुलांना कष्टाच्या मोबदल्यामध्ये स्वावलंबी पद्धतीने चांगले शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे त्यांना या योजनेबद्धल आस्था वाटली. हे दोन अधिकारी नंतर केंद्रीय शिक्षण खात्यात गेले. आण्णा काही वर्षांनी दिल्लीला गेले असताना या दोन अधिकाऱ्यांनी त्यांची भेट मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्याशी घालून दिली. त्यावेळी आण्णांच्या स्वावलंबी

शिक्षण योजनेची माहिती शिक्षणमंत्र्यांनी घेवून त्यांच्या कार्याची स्तुती केली. आण्णांना प्रोत्साहन म्हणून १०,००० रूपये अनुदान दिले. त्यावेळी कबीर व प्रा. सय्यदीन यांनी आण्णांना असे सुचविले की या स्वावलंबी योजनेप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यास शिक्षण मिळेल असे एक 'मॉडेल स्कूल' संस्थेने चालवावे, त्यासाठी किती जमिनीची आवश्यकता आहे. तसेच मुलांना किती व कोणते काम देता येईल त्यातून पैशाचे किती उत्पन्न होईल, सर्व आकडेवारीसह तयार करून केंद्राकडे प्रस्ताव पाठवावा. या 'मॉडेल स्कूल'ला केंद्रातून दरवर्षी अनुदान देता येईल पण याप्रमाणे पुढे काही ठोस विचार होवू शकला नाही. तरीदेखील यांनी नंतर भारतीय शिक्षण पद्धतीवर एक लेख इंग्रजी मासिकात लिहिला. त्यात त्यांनी कर्मवीरांचे कार्य व 'कमवा व शिका' योजनेबद्धल चागले उद्‌गार काढले होते.[१७]

१९५९ मध्ये मुंबई शासनाने 'ई.बी.सी. सवलत' या योजनेसंदर्भात कमाल वार्षिक उत्पन्न ९०० इतके रूपये जाहीर केले. त्यावेळचे शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई व मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुढाकाराने ही योजना सुरू झाली. भाऊराव आजारी असल्याने पुणे येथील ससून रूग्णालयात दाखल झालेले होते. त्यावेळी ना. बाळासाहेब देसाई भाऊरावांच्या भेटीसाठी आले असताना त्यांनी या योजनेबद्दल आण्णांना माहिती दिली. आण्णा त्यावर म्हणाले, "बाळासाहेब ही योजना तुम्हाला गोंडस वाटते पण पुढे मुलांना सवलती मिळविण्याची सवय होईल व शिक्षणाचे कंबरडे मोडेल अशी भिती मला वाटते.[१८] मुलांना विनाश्रमाच्या मोबदल्यात सवलती मिळणार. हे फुकटचे दान अतिमारक ठरेल. आण्णांची ही भिती रास्त होती हे गेल्या दहा वर्षातील 'राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयातील' 'कमवा व शिका' योजनेच्या इतिहासावरून सिद्ध होत आहे.

आण्णांनी सिद्ध केलेल्या प्रयोगाची मुलभूत सूत्रे खालीलप्रमणे -

१) प्रत्येक विद्यार्थ्याने श्रम केलेच पाहिजेत.

२) हे श्रम व्यावहारिक कसोटीवरही उतरतील असे उत्पादक असावेत.

३) या श्रमाच्या बाबतीत बुद्धीमान, कमी बुद्धीचा, श्रीमंत, गरीब असा भेद विद्यार्थ्यांच्यामध्ये केला जाऊ नये.

४) या श्रमाला पूरक असे काही सहाय्य विद्यार्थ्याला शिक्षण व्यवस्थेने केले पाहिजे.

५) यानंतर उरणारा भाग बिनव्याजी कर्जरूपाने विद्यार्थ्याला मिळण्याची तरतूद असली पाहिजे.[१९]

कमवा व शिका या योजनेची सुरूवात संस्थेचे पहिले महाविद्यालय शिवाजी महाविद्यालयामध्ये झाली. आण्णांचा हा यशस्वी प्रयोग संस्थेच्या इतर महाविद्यालयातही सुरू झाला. पुढील काळात शिवाजी विद्यापीठाने या योजनेचा स्विकार केला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या व आण्णांच्या विचारधारेप्रमाणे कोल्हापूरमधील रयत शिक्षण संस्थेचे राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये 'कमवा व शिका' ही योजना यशस्वीरित्या सुरू आहे. महाविद्यालयातील 'कमवा व शिका' या योजनेची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयातील 'कमवा आणि शिका' योजनेची सुरवात व तिचा विकास -**

१९६७ मध्ये किर्ती महाविद्यालयाचे हस्तांतर रयत शिक्षण संस्थेकडे झाले. त्यामुळे १९६९ मध्ये किर्ती महाविद्यालयाचे 'राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय' असे नामकरण करण्यात आले. १९७१-७२ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयामध्ये 'कमवा आणि शिका' या योजनेचा प्रारंभ झाला.[२०]

रयत शिक्षण संस्थेची बहुतेक महाविद्यालये ग्रामीण भागात असल्याने तेथे श्रमयोजनेसाठी शेतजमीन उपलब्ध होणे सुलभ होते. पण कोल्हापूर शहरात श्रमयोजनेसाठी अशी शेतजमीन मिळणे अशक्य होते. संस्थच्या रूकडी येथील जमिनीत पंचगंगेचे पाणी लिफ्टने मिळू लागल्यावर शाहू कॉलेजने श्रमयाजनेचे, वसतीगृहाचे असे सर्वच विद्यार्थी रूकडीस ठेवायचे व त्याना रूकडी ते कोल्हापूर असे रेल्वेपास काढून द्यावयाचे अशी कल्पना त्यावेळचे रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन श्री रामभाऊ नलावडे यांनी मांडली. परंतू अनेक अडचणींमुळे ही योजना यशस्वी झाली नाही.[२१]

सुरवातीला प्रांगण स्वच्छ करणे, झाडांना पाणी घालणे, इमारतीची झाडलोट करणे, खडक फोडणे, भाजीची रोपे लावणे, घंटा देणे, रात्री पहारा करणे, ग्रंथालय व कार्यालयामध्ये मदत करणे इ. कामे विद्यार्थी करत होते.

या याजनेतून विद्यार्थ्यांनी छोटासा खडूचा कारखानाही सुरू केला. या खडूचा वापर महाविद्यालयात जाणीवपूर्वक केला जात होता. महाविद्यालयात वापरला जाणरा खडूही आमचाच आहे. हा विशेष आनंद विद्यार्थ्यांना होता. महाविद्यालयीन उपहारगृहही विद्यार्थी स्वतः चालवित.[२२]

श्रमयोजनेतली विद्यार्थ्यांना पुरेशी कामे उपलब्ध करून देणे आवश्यक होते. ही एक समस्या महाविद्यालयापुढे होती. या समस्येतून ताबडतोब मार्ग काढावा म्हणून रोटरी क्लबच्या एका सभेत कॉलेजतर्फे सर्वश्री प्रा. चंद्रकांत पाटगावकर व प्रा. ज. रा. दाभोळे यानी श्रमयोजनेसाठी विद्यार्थ्यांना मदत करण्याचे आवाहन सर्व रोटरीयन्सना केले. त्या आवाहनास तात्काळ प्रचंड प्रतिसाद मिळाला पहिल्याच वर्षी २८ विद्यार्थी संबंधितांनी स्विकारले.[२३]

उद्यमनगरातील कारखान्यात लेथवर काम करणे, डॉक्टर मंडळींकडे रिसेप्शनिस्ट म्हणून काम करणे, बंगल्यातील बागकाम, घरातील बाजारहाट, मेहता कंपनीतील

कागदाची वह्या-पाकीटे तयार करणे, हिशेब लिहणे, विक्री विभाग सांभाळणे अशी अनेक कामे रोटरी क्लबतर्फे विद्यार्थी करू लागले.[२४]

कॉलेजमधील शिपायांची कामे करणे,बांधकामात इमारत पाया खुदाई, कंपाऊंड खांब खुदाई, झाडांसाठी खड्डे खुदाई, स्वयंपाक करणे, महाविद्यालयाची स्वच्छता, सफाई करणे इ. कामे विद्यार्थी आपला अभ्यास सांभाळून करू लागले.[२५]

१९७२-७३ या शैक्षणिक वर्षामध्ये श्रमयोजनेस सामाजिक अविष्कार प्राप्त झाला. कोल्हापूरातील रोटरी क्लबच्या निरनिराळ्या सभासदांनी या योजनेतील काही विद्यार्थी दत्तक घेतले. कोल्हापूरचे कारखानदार व धनिक या योजनेतील विद्यार्थ्यांना काम देत व त्याचा मोबदला म्हणून कॉलेजकडे त्यांच्या जेवणाचा खर्च देत होते. याबाबतीत कोल्हापूरचे रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री. शिरगावकर व उपाध्यक्ष श्री विजय शिंदे यानी पुढाकार घेऊन या योजनेस मुर्त स्वरूप दिले.[२६]

'कमवा व शिका' या योजनेतील विद्यार्थी ७.३० ते १२.३० या वेळेत महाविद्यालयामध्ये हजर राहून दुपारी ३ ते ६ या वेळेत विविध ठिकाणी काम करू लागले. बागकामापासून सेल्समनपर्यंत व घरकामापासून कम्पाऊडरपर्यंत कोणतेही पडेल ते काम हे विद्यार्थी आनंदाने करत.[२७] गणेश विसर्जनावेळी शिवाजी पुतळा या ठिकाण पाणपोई सुरू करून सलग तीन दिवस रात्र श्रमयोजनेतील विद्यार्थ्यांनी काम केले.[२८] महाविद्यालय गावापासून दूर असल्यामुळे विद्यार्थी विद्यार्थ्यांनींच्या अल्पोपहाराची सोय व्हावी म्हणून 'कमवा व शिका' या योजनेमार्फत उपहारगृह चालविले जात होते. या उपगृहारमधील सर्व पदार्थ विद्यार्थीच करीत असत.[२९] महाविद्यालयातील इमारत बांधकामामध्ये श्रमयोजनेतील विद्यार्थ्यांनी काम केले. मुख्य इमारतीच्या विस्तारीकरणाचा एक भाग म्हणून पाया खुदाईचे काम सुमारे तीन महिने सुरू होते. त्यामध्ये श्रमयोजनेतील

अरूण धायगडे, मधुकर जगताप, अंगद धायगडे, शकर जगताप, अनंत धालगडे, पद्ममाकर खोसे, भारत निकम या ११ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा महत्त्वाचा वाटा होता.[३०] महाविद्यालयाच्या आवारातील कर्मवीर भाऊराव पाटील यांचा पुतळा व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा पुतळा यांच्या चबुतऱ्याच्या बांधकामामध्ये श्रमयोजनेतील विद्यार्थ्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

महाविद्यालयातील विविध कामे करणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज ४ रू. (चार रूपये) एवढा मोबदला मिळत असे.[३१] महाविद्यालयातील श्रमयोजना कधीही तोट्यात गेली नाही. साधेपणाने जेवण-कपडे याचा खर्च व्यवस्थित भागविला जात असे. महाविद्यालयावर या योजनेचा आर्धिक भारही पडला नाही.[३२]

**'कमवा आणि शिका' योजनेस कोल्हापूरमधील रोटरी क्लबचे सहकार्य -**

रोटरी क्लबचे प्रेसिडेंट श्री. विजय शिंदे यांनी महाविद्यालयातील दोन विद्यार्थी (लगडे. एस.ए., शस्त्रे. टी.ए.) दत्तक घेतले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मोफत वह्या, पुस्तके, कपडे रोटरी क्लबच्या सदस्यांनी सतत उपलब्ध करून दिली.[३३]

इनर व्हील क्लबचे सौ. व श्री. करमकर यानी अमर, अकबर ॲन्थनी, चित्रपटाचे उत्पन्न १४५१ रूपये श्रमयोजनेसाठी दिले.[३४] रोटरी अध्यक्ष मा. मनोहरपंत मिरजे, डॉ. मा.ना. जोशी यांना 'त्रिशूल' चित्रपटाचे उत्पन्न २८३५ श्रमयोजनेला दिले.[३५]

श्रमयोजनेतील विद्यार्थ्यांना व्यावसायिक अनुभव मिळावा म्हणून रोटरी क्लबने २६ जानेवारी १९७७ रोजी एक हॉटेलगाडी महाविद्यालयास दिली. १ जानेवारी १९७८ रोजी या हातगाडीचे उद्‌घाटन श्रममहर्षी बाबा आमटे यांच्या हस्ते झाले. २६ जानेवारी १९७८ पासून भाऊसिंगजी रोडवर सुरू करण्यात आली. हॉटेल गाडीसाठी गॅसबत्ती

सहाय्य श्री. नागरशेठ यांनी केले. या हॉटेल गाडीवर श्री. जगताप. जे. आर., श्री. उमराणी. एम.बी., श्री. चौगुले. बी.जी., श्री. सावंत. आर.व्ही. या विद्यार्थ्यांनी काम केले.[३६]

रोटरी क्लबतर्फे श्रमयोजनेतील विद्यार्थ्यांनाही आर्थिकदृष्टीने कार्य केलेच. त्याचबराबर विद्यार्थ्यांना मोफत वैद्यकिय सेवादेखील उपलब्ध करून दिली. डॉ. एम.एन. गोगटे यांनी श्रमयोजनेतील संपत माने व आदबराव बी.व्ही. या विद्यार्थ्यांचे टॉन्सीलसचे ऑपरेशन केले.[३७] डॉ. व्ही.एस. करांडे, डॉ. मा.ना. जोशी, डॉ. भद्रे यांनी लोखंडे संभाजी दादू या विद्यार्थ्याचे विनामुल्य आवळूचे ऑपरेशन केले.[३८] डॉ. सुभाष आठले यांनी श्रमयोजनेतील विद्यार्थी, लांडगे याच्या मोडलेल्या हातावर मोफत शस्त्रक्रिया केली.[३९] डॉ. गोगटे यानी श्रमयोजनेतील आकरावीचा विद्यार्थी श्री. राजाराम शिंदे याच्या कानाचे ऑपरेशन विनामूल्य केले.[४०] श्रमयोजनेतील विद्यार्थी तानाजी नलवडे यास क्षय झाल्यानंतर डॉ. मा.ना. जोशी यानी या विद्यार्थ्यांच्या औषधोपचार, रहाणे, भोजन व विश्रांतीची सोय केली.[४१] रोटरी क्लब आणि कोल्हापूरवासियांनी अनमोल असे सहकार्य या योजने संदर्भात केल्याचे दिसून येते.

**श्रमयोजनेतून शिक्षण घेतलेले माजी विद्यार्थी -**

आण्णांना काही शिक्षणतज्ज्ञांनी सुचविले की हुशार मुलांना श्रमयोजनेतून वेगळे करून खास शिकवण्या लावा. त्यामुळे ही मुले पुढे संस्थेचे नाव काढतील पण यावर आण्णांचे म्हणणे असे होते की, असे केल्याने श्रम करणारे व न करणारे असे मुलांचे गट पडतील श्रम करणाऱ्या मुलांना हे विद्यार्थी कमी लेखतील म्हणून प्रत्येकाने काम केलेच पाहिजे असे आण्णांचे म्हणणे होते.[४२] आण्णांच्या मताप्रमाणे श्रमयोजनेचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर काही परिणाम झाला नाही. राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी श्रमयोजनेत काम करून आपले शिक्षण तर पूर्ण केलेच शिवाय समाजातही

आपला वेगळा ठसा उमटविला आहे.

त्यामध्ये 'उपरा' का श्री. लक्ष्मण माने, श्री. एम.के.बाड, श्री. एम.बी. शेख, श्री. दिलीप कांबळे इत्यादींचा उदाहरणादाखल उल्लेख करता येईल.

लक्ष्मण माने यांनी शाहू महाविद्यालयामध्ये श्रमयोजनेत काम करून आपले शिक्षण पुर्ण केले आहे. 'उपरा' या त्यांच्या आत्मचरित्रास अमेरिकन फोर्ड फौंडेशनचे दोन लाख रूपयांचे पारितोषिक मिळाले. ते या पैशाचा विनियोग स्वतःसाठी न करता आपल्या समाजातील भटक्या व विमुक्त जातीच्या प्रगतीसाठी करीत आहेत. सद्या ते शिवाजी विद्यापीठातील सिनेटचे सदस्य आहेत. एक समाज चिंतक आहेत. भटक्या विमुक्त जातीच्या विकासासाठी कार्य करत आहेत.[४३]

श्री एम.के.बाड हे श्रमयोजनेतून शिक्षण घेतलेले विद्यार्थी. सद्या कोल्हापूरमधील यशस्वी उद्योगपती आहेत. त्याचप्रमाणे समजासेवाही करीत आहेत. महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघाचे सदस्य म्हणनूही कार्यरत आहेत.

श्री एम.बी.शेख हे श्रमयोजनेतून शिक्षण घेतलेले विद्यार्थी आहेत. आज कोल्हापूरातील एक यशस्वी उद्योगपती उदार आणि सामाजिक जाणीव असणारी व्यक्ती म्हणून त्याची ख्याती आहे. ते माजी विद्यार्थी संघाचे सदस्य आहेत.

श्री दिलीप कांबळे हे श्रमयोजनेतून शिक्षण घेतलेले विद्यार्थी आहेत. ते सद्या ओरीसा येथे लेबर ऑफीसर म्हणून कार्य करीत आहेत.[४४]

**श्रमयोजनेतील विद्यार्थी संख्या -**

१९७१-७२ या शैक्षणिक वर्षापासून श्रमयोजनेस सुरवात झाली. ती आजपर्यंत महाविद्यालयामध्ये यशस्वीपणे सुरू आहे. श्रमयोजनेतील विद्यार्थी संख्या खालीलप्रमाणे आहे.[४५]

| वर्ष | विद्यार्थी संख्या | रोटरी क्लबने दत्तक घेतलेली विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १९७१-७२ | ६२ | |
| १९७२-७३ | ७५ | २४ |
| १९७३-७४ | ७५ | २८ |
| १९७४-७५ | ७५ | २५ |
| १९७५-७६ | ४५ | २३ |
| १९७६-७७ | ४० | - |
| १९७७-७८ | ५० | आर्थिक मदत |
| १९७८-७९ | ४५ | आर्थिक मदत |
| १९७९-८० | - | - |
| १९८०-८१ | ४० | वैद्यकीय मदत |
| १९८१-८२ | २२ | १८ |
| १९८२-८३ | २५ | २० |
| १९८३-८४ | ५० | ३० |
| १९८४-८५ | - | - |
| १९८५-८६ | ४२ | १८ |
| १९८६-८७ | ५५ | ४० |
| १९८७-८८ | ३५ | - |
| १९८८-८९ | २५ | - |
| १९८९-९० | २० | - |
| १९९०-९१ | २८ | - |
| १९९१-९२ | ३० | - |
| १९९२-९३ | २८ | - |
| १९९३-९४ | २२ | - |

| वर्ष | विद्यार्थी संख्या | रोटरी क्लबने दत्तक घेतलेली विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १९९४-९५ | - | - |
| १९९५-९६ | २२ | - |
| १९९६-९७ | - | - |
| १९९७-९८ | १५ | - |
| १९९८-९९ | १५ | - |
| १९९९-२००० | - | - |
| २०००-२००१ | - | - |
| २००२-२००३ | १६० | - |
| २००३-२००४ | ६० | - |
| २००४-२००५ | ४६ | - |

'कमवा व शिका' या योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वसाधारणपणे निश्चित व समान राहिली नसली तरी आवश्यकतेनुसार सदर योजनेमध्ये प्रवेश देऊन महाविद्यालय प्रशासनाने दुर्बल समाजातील गरजू विद्यार्थ्यांना सर्व त्या सुविधा पुरवून त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यामध्ये मोठे योगदान पार पाडले आहे.

**वसतिगृह -**

रयत शिक्षण संस्थेच्या इतिहासामध्ये वसतिगृह या कल्पनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण रयत शिक्षण संस्थेची सुरवात मुळी वसतिगृहाच्या स्थापनेपासून झाली आहे. ज्या वर्गातील, विभागातील मुलांना शिक्षणाची संधी कधीही मिळालेली नव्हती अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी कधीही मिळालेली नव्हती अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाची द्वारे खुली करावयाची तर त्याच्यासाठी प्रथम शहरासारख्या ठिकाणी राहण्या-जेवणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. या हेतूने आण्णांनी साताऱ्याला धनिणीच्या बागेत वसतिगृहास सुरवात करून रयत शिक्षण संस्थेच्या कार्यास प्रारंभ केला.

बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. कोल्हापूरसारख्या शहराच्या ठिकाणी राहून शिक्षण घेणे हे तर सामान्य परिस्थितीतील विद्यार्थ्यांना अशक्य अशी बाब होती. म्हणून कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाचे त्यावेळचे प्राचार्य आर.डी. गायकवाड यांनी कर्मवीरांचे शैक्षणिक व सामाजिक उद्दिष्टये डोळ्यासमोर ठेवून १९७१ साली कॉलेज वसतिगृहाची स्थापना केली.[४६]

शाहू महाविद्यालयामध्ये बीड, परभणी, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर या सारख्या दूरच्या भागातील विद्यार्थी प्रवेश घेतात. महाविद्यालयातील 'कमवा व शिका' योजनेमध्ये काम करून हे विद्यार्थी आपले शिक्षण पूर्ण करतात.[४७] वसतिगृह स्थापण्याच्या पूर्वी वसतिगृहाची किती आवश्यकता होती हे वसतिगृहातील विद्यार्थी संख्येवरून समजते.

महाविद्यालयाच्या वसतिगृहामध्ये प्रारंभापासूनच सर्व जातीचे व धर्माचे विद्यार्थी एकत्र राहतात. या विद्यार्थ्यांवर राष्ट्रीय एकात्मतेचे संस्कार केले जातात. विशेषतः मागावर्गीय दलित विद्यार्थ्यांची संख्या शाहू महाविद्यालयामध्ये अधिक आहे. त्यांच्या अडीअडचणी सोडविण्याचा प्रयत्न महाविद्यालयामध्ये केला जातो. सरकारकडून शिष्यवृत्तीच्या रक्कमेची वाट न पाहता महाविद्यलयामध्ये व वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या राहण्या-जेवण्याची सोय महाविद्यालयाने केली आहे. कोल्हापूरातील इतर महाविद्यालयांपेक्षा शाहू महाविद्यालयामध्ये दलित व मागास विद्यार्थी संख्या अधिक आहे.[४८] वसतिगृहामध्येही दलित मागास विद्यार्थी संख्या अधिक आहे हे वसतिगृहातील विद्यार्थी यादीवरून स्पष्ट होते.[४९]

| वर्ष | दलित वर्गातील विद्यार्थी संख्या | इतर वर्गातील विद्यार्थी संख्या | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १९७१-७२ | ५० | - | ५० |
| १९७२-७३ | ६० | ६५ | १२५ |
| १९७३-७४ | ५० | ५५ | १०५ |
| १९७४-७५ | ६० | ६० | १२० |
| १९७५-७६ | ७० | ४२ | ११२ |
| १९७६-७७ | ७० | ४४ | ११४ |
| १९७७-७८ | ३० | २० | ५० |
| १९७८-७९ | ४० | १० | ५० |
| १९७९-८० | ३० | ३७ | ६७ |
| १९८०-८१ | ३० | ३७ | ६७ |
| १९८१-८२ | ३० | २५ | ५५ |
| १९८२-८३ | ८७ | ७ | ९४ |
| १९८३-८४ | ९६ | १४ | ११० |
| १९८४-८५ | ६५ | ३५ | १०० |
| १९८५-८६ | ७५ | ५० | १२५ |
| १९८६-८७ | ६३ | ६७ | १३० |
| १९८७-८८ | १८ | ५३ | ७१ |
| १९८८-८९ | १४ | ४४ | ५८ |
| १९८९-९० | १० | ४० | ५० |
| १९९०-९१ | १२ | ३७ | ४९ |
| १९९१-९२ | १२ | ३१ | ४३ |
| १९९२-९३ | ९ | ३२ | ४१ |
| १९९३-९४ | ९ | २४ | ३३ |

| वर्ष | दलित वर्गातील विद्यार्थी संख्या | इतर वर्गातील विद्यार्थी संख्या | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १९९४-९५ | १० | ३० | ४० |
| १९९५-९६ | १७ | ३१ | ४८ |
| १९९६-९७ | - | - | - |
| १९९७-९८ | १३ | १५ | २८ |
| १९९८-९९ | १५ | २३ | ३८ |
| १९९९-२००० | १३ | ३१ | ४४ |
| २०००-२००१ | १७ | २९ | ४६ |
| २००१-२००२ | ८ | १८ | २६ |
| २००२-२००३ | ९ | १४ | २३ |
| २००३-२००४ | ७ | १३ | २० |
| २००४-२००५ | - | - | ३८ |

२००४-२००५ या शैक्षणिक वर्षामध्ये वसतिगृहामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची जाती निहाय विद्यार्थी संख्या यादी खालीलप्रमाणे देता येईल.[५०]

| खुला | एस.सी. | ओ.बी.सी. | एन.टी. | एकूण |
|---|---|---|---|---|
| २१ | ८ | ६ | ३ | ३८ |

१९७१ पासून आजपर्यंत वसतिगृह व'कमवा आणि शिका'योजना हे दोन्ही विभाग सुरळीत चालू आहेत. हे दोन्ही विभाग एकमेकांशी संबंधित आहेत. या दोन्ही विभागांचे कार्य महाविद्यालयीन प्राध्यापकांनी प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थीत पार पाडले आहे. त्यामध्य प्रा. ज.रा. दाभोळे, प्रा. दगडे. एस.एन., प्रा. आनंदराव जाधव, प्रा. के.आर. पाटील, प्रा. के.अे. खतीब, प्रा. श्यामराव वंटमुरी, प्रा. अनिल उबाळे इत्यादी उत्साही, संस्थेशी एकनिष्ठ असणाऱ्या आणि भाऊराव

पाटील यांच्याविषयी, मनामध्ये श्रद्धा असणाऱ्या क्रियाशील व विचारवंत प्राध्यापकांचा समावेश होतो.[५१]

**'कमवा आणि शिका' या योजनेमधील काही समस्या -**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'कमवा आणि शिका' योजना सुरू केल्यानंतर ग्रामीण भागातील अनेक गरीब विद्यार्थ्यांनी या योजनेत सहभागी होऊन आपले शिक्षण पूर्ण केले. परंतू सद्या महाविद्यालयीन स्तरावर या योजनेपुढे अनेक समस्या आहेत. त्यापुढील प्रमाणे -

१) पूर्वी 'कमवा आणि शिका' या योजनेमध्ये ११ वी १२ वी पासून बी.ए. पर्यंतचे विद्यार्थी सहभागी होत असत परंतु सरकारने बालमजुरी हा कायद्याने गुन्हा ठरविल्यामुळे ११ वी १२ वी तील विद्यार्थी या योजनेमध्ये सहभागी होवू शकत नाहीत.

२) आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना १९६१ पासून फी माफीची सवलत मिळू लागली. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या मिळू लागल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आर्थिक अडचणी काही प्रमाणात कमी झाल्या. त्यांचा शैक्षणिक खर्चाची समस्या कमी झाली. त्यामुळे 'कमवा आणि शिका' योजनेत विद्यार्थी सहभागी होण्याचे प्रमाण कमी झाले.

३) शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाल्याने तालुक्यात व मोठ्या गावातही हायस्कूल, कॉलेज शिक्षणाची सोय उपलब्ध होवू लागली. त्यामुळे या योजनेत सहभागी होण्याचा विद्यार्थ्यांचा दृष्टिकोण बदलत गेला. बीड, उस्मानाबद, सोलापूर इ. गावापासून दूर कोल्हापूरमध्ये जावून शिक्षण घेणे विद्यार्थ्यांना अडचणीचे वाटू लागले. त्यामुळे योजनत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली.

४) अलीकडच्या काळामध्ये बहुजन समाजामध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षण प्रसार झाला आहे. तसेच आरक्षणामुळे मागासवर्गीय समाजाला नोकऱ्या मिळत आहेत. त्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. अशा सधन कुटुंबातील मुलांना व

त्यांच्या आई वडिलांना मुलांनी कष्ट करून शिक्षण घेण्याची गरज वाटत नाही. त्यामुळे या योजनेची गरज कमी झालेली आहे.

५) योजनेच्या सुरवातीच्या काळामध्ये जी मुले या योजनेत सहभागी होवून शिक्षण घेत होती. त्यामधील पदवीधर, पदव्युत्तर झालेल्या मुलांना विद्यार्थ्यांना संस्थेमध्ये कोणत्याही पदावर शिफारशीशिवाय नोकरी मिळत असे. पण सद्या या योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्याला संस्थेमध्ये नोकरी मिळण्याची शाश्वती नाही. पूर्वी ही योजना म्हणजे नोकरी मिळण्याचे हामखास साधन होते. पण आता तसे होत नाही. म्हणून या योजनेत सहभागी होण्यास विद्यार्थी उत्सुक नसतात.

६) योजनेच्या सुरवातीच्या कालखंडामध्ये शिक्षणासाठी विद्यार्थी पडेल ते कष्ट करण्याच्या तयारीत असायचे. परंतू सध्या शिक्षण विद्यार्थ्यांना कमी कष्टामध्ये मिळत आहे. त्यामुळे त्यांना या योजनेचे महत्त्व वाटत नाही.

७) स्वावलंबन हा या योजनेचा मूळ पाया आहे. व्यक्ती उच्च शिक्षण घेवून कीतीही उच्च पदापर्यंत गेली तरीही तिला कष्टाची लाज वाटू नये हा मुख्य दृष्टिकोन या योजनेपाठीमागे होता. या योजनेमधून श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, चारित्र्य संपन्नता इ. आदर्श घडविले जातात. परंतु सद्याच्या काळात वरील आदर्शापेक्षा पैसा श्रेष्ठ झाला आहे. पैशाला समाजामध्ये प्रतिष्ठा लाभली आहे. त्यासाठी भ्रष्टाचार वाढला आहे. स्वार्थी, कष्ट न करता पैसा मिळविण्याची वृत्ती वाढली आहे. त्यामुळे या योजनेचे महत्त्व कमी झाले आहे.

**निष्कर्ष -**

'कमवा व शिका' या उपयुक्त योजनेमधील विद्यार्थी संख्या तुलनेने कमी झाली असली तरी योजनेच्या सुरवातीच्या काळामध्ये योजनेची जेवढी गरज होती, तेवढीच गरज सध्याच्या काळातही आहे. गरीब व मागासलेल्या समाजाला ही योजना अतिशय फायदेशिर व उपयुक्त ठरली आहे. शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात

होण्यासाठी ही योजना उपयोगी ठरली आहे. या योजनेमधून आदर्श असे विद्यार्थी घडविले जातात. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामध्ये जिव्हाळयाचे संबंध निर्माण होतात. विद्यार्थ्यांच्या शारिरीक श्रमाबरोबर शिक्षणालाही महत्त्व दिले जाते. चारित्र्यसंपन्न विद्यार्थी या योजनेमधून घडविले गेले आहेत.

**मूल्यमापन -**

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये 'कमवा आणि शिका' ही योजना यशस्वीपणे वाटचाल करीत आहे. स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा, चारित्र्यसंपन्नता इ. गुण विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्याचा प्रयत्न या योजनेमधून केला जातो. या योजनेमधील विद्यार्थी खड्डे खणण्यापासून विविध प्रकारची शारिरीक कष्टाची कामे करतात. त्यामुळे पुढे अशा विद्यार्थ्यांना कष्ट करण्याची लाज वाटत नाही. ज्या विद्यार्थ्यांना कष्ट करण्याची सवय नसते त्या विद्यार्थ्यांना स्वतःची कामे करण्याचीही लाज वाटते. श्रमयोजनेमध्ये काम केल्यामुळे विद्यार्थ्यांना पैसा मिळविण्यासाठी आपल्या आईवडिलांना किती कष्ट करावे लागतात याची जाणीव होते. त्यामुळे त्यांना आई-वडिलांच्या कष्टाची कल्पना येते. तसेच असे विद्यार्थी पैसा खर्च करतानाही फार जपून करतात. कारण त्यांना पैशाचे मूल्य समजलेले असते. श्रमयोजनेतील विद्यार्थ्यांना वेळेचे पैशाचे श्रमाचे महत्त्व कळल्यामुळे हे विद्यार्थी शक्यतो वाईट मार्गाला जात नाहीत. कारण त्यांच्याकडे भरपूर मोकळा वेळ असत नाही. त्यामुळे हे विद्यार्थी चारित्र्यसंपन्न बनून कुटुंबातील, समाजातील आपली जबाबदारी ओळखतात. त्यातूनच एक आदर्श नागरिक निर्माण होण्यास मदत होते. आजही विविध महाविद्यालये आणि शिवाजी विद्यापीठामध्ये अनेक गरीब विद्यार्थी या श्रमयोजनेत सहभागी होवून आपले भविष्य घडवत आहेत. देशाचे आदर्श नागरीक बनत आहेत. भारतात दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या बहुजन समाजातील गरीब गरजू व प्रामाणिक विद्यार्थ्यांसाठी ही योजना फलदायी ठरलेली आहे.

## संदर्भ सूची


१. 'कर्मवीर भाऊराव पाटील', 'शोध आणि बोध', प्रा. मो. नि. ठोके. मेहता पब्लिशिंग हाऊस, एप्रिल १९८७, पृ. क्र. २.

२. पवार. बा.ग. 'ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक, कर्मवीर भाऊराव पाटील मातृभूमी प्रकाशन, पुणे, १९८७.

३. उपरोक्त, पवार बा.ग., पृ. क्र. ५.

४. कित्ता, पृ. क्र. १२२.

५. कित्ता, पृ. क्र. ५..

६. पाटील. बॅ. पी.जी., 'कर्मविशेपनिषध', एक चिंतन, पृ. क्र. ९,१०.

७. कित्ता, पृ. क्र. ९,१०.

८. कित्ता, पृ. क्र. ५५.

९. कित्ता, पृ. क्र. ५०.

१०. कित्ता, पृ. क्र.५१.

११. कित्ता, पृ. क्र. ६६, ६७.

१२. उपरोक्त, पवार. बा.ग. पृ. क्र. ३०२, ३०३.

१३. रौप्यमहोत्सवी स्मरणिका, राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर (१९८६-८७) लेख-शिक्षण तिर्थकार आणि रयत शिक्षण संस्था, प्रा. श्रीधर हेरवाड.

१४. एम्. फिल. प्रबंध, छत्रपती शिवाजी कॉलेजचा चिकीत्सक अभ्यास (१९४७-१९९५), उर्मिला क्षिरसागर, पृ. क्र. १३१.

१५. कित्ता, पृ. क्र. १३१.

१६. कित्ता, पृ. क्र. १३२.

१७. कित्ता, पृ. क्र. १३१.

१८. कित्ता, पृ. क्र. १४६.

१९. कित्ता, पृ. क्र. १४७.

२०. वार्षि्क नियतकालिक, 'राजर्षी', १९७१-७२.

२१. उपरोक्त, रौप्यमहोत्सवी स्मरणिका, लेख आमची २५ वर्षांची वाटचाल, भाग-१, प्रा. चंद्रकांत पाटगावकर.

२२. उपरोक्त, वार्षिक नियतकालिक, १९७१-७२.

२३. उपरोक्त, रौप्यमहोत्सवी स्मरणिक, लेख आमची २५ वर्षांची वाटचाल, भाग-१, सामाजिक सांस्कृतिक, प्रा. चंद्रकात पाटगावकर.

२४. कित्ता.

२५. कित्ता.

२६. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९७२-७३.

२७. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९८७-८८.

२८. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९८५-८६.

२९. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९७८-७९.

३०. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९८३-८४.

३१. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९८५-८६.

३२. उपरोक्त, रौप्यमहोत्सवी स्मरणिका, भाग - १, प्रा. चंद्रकांत पाटगावकर.

३३. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९७५-७६.

३४. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९७७-७८.

३५. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९७८-७९.

३६. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९७६-७७.

३७. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९७७-७८.

३८. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९७८-७९.

३९. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९८०-८१.

४०. कित्ता.

४१. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९८२-८३.

४२. 'नॅक अहवाल' राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, २००३-०४.

४३. कित्ता.

४४. कित्ता.

४५. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९७१-७२ ते २००५-०६.

४६. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९७१-७२.

४७. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९८५-८६.

४८. उपरोक्त, रौप्यमहोत्सवी स्मरणिका (१९८६-८७), प्रा. चंद्रकांत पाटगावकर.

४९. कार्यालयीप दफ्तर.

५०. कार्यालयीप दफ्तर.

५१. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९७१-७२ ते २००५-०६.


❑❑❑